सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७

# मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६

(दिनांक ३० जून, १९९७ पर्यंत सुधारित)

**BOMBAY ACT No. XXVII OF 1946**

# THE BOMBAY COTTON (STATISTICS) ACT, 1946

**(As modified upto the 30th June 1997)**

व्यवस्थापक, येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६ यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित

२००६

[किंमत : ४.८० रुपये]

SC(H)729

# मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६.

## अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे.


| | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ | .. | १ |
| २. | व्याख्या | .. | २ |
| ३. | कापसासंबंधी वार्षिक पत्रके सादर करणे | .. | २ |
| ४. | (कागदपत्र) पाहण्याचा, तपासण्याचा व शोधण्याचा हक्क | .. | २ |
| ५. | पत्रकाचा किंवा माहितीचा उपयोग | .. | ३ |
| ६. | पत्रके व माहिती प्रसिद्ध करण्यावर निर्बंध | .. | ३ |
| ७. | शास्ती | .. | ३ |
| ८. | माहिती किंवा पत्रके अयोग्य रीतीने उघड केल्याबद्दल शास्ती | .. | ४ |
| ९. | अपराधांची दखल घेणे | .. | ४ |
| १०. | सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण | .. | ४ |
| ११. | संस्थांनी केलेले अपराध | .. | ४ |
| १२. | वगळणे | .. | ४ |
| १३. | नियम करण्याचा अधिकार | .. | ४ |

# सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७[1]

## [मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६]†

### [१८ नोव्हेंबर १९४६]

या अधिनियमात विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये अनुकूलन व रूपभेद करण्यात आले आहेत.

मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ याद्वारे अनुकूलन व रूपभेद

महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याद्वारे अनुकूलन व रूपभेद

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याद्वारे सुधारणा करण्यात आली.

**[2][महाराष्ट्र राज्यातील] भारतीय कच्च्या कापसाच्या साठ्यांची आकडेवार माहिती गोळा करण्याचे काम सुलभ करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** [3][राज्यातील] भारतीय कच्च्या कापसाच्या साठ्यांची आकडेवार माहिती गोळा करण्याचे काम सुलभ करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** याअन्वये पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात आला आहे :-

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास मुंबई कापूस (आकडेवारी) अधिनियम, १९४६ असे म्हणावे.

[4][(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.]

(३) तो [5][राज्य] शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे जी तारीख नेमील त्या तारखेस अंमलात येईल.

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, मुंबई शासन राजपत्र, १९४६, भाग पाच, पृष्ठ ६७ पहा; विधानसभेच्या कामकाजासाठी मुंबई विधानसभा वादविवाद, १९४६, खंड नऊ पहा; विधानपरिषदेच्या कामकाजाकरिता, मुंबई विधानपरिषद, १९४६ खंड दहा पहा.

[2] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ३ (अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४ याद्वारे मूळ मजकुराऐवजी पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[5] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† हा अधिनियम महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित भागात लागू करण्यात आला आहे आणि तो त्या भागात अंमलात येईल. (सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याचे कलम २ पहा.)

व्याख्या. २. विषयात किंवा संदर्भात एतद्विरुद्ध काही नसल्यास या अधिनियमात :—

(क) "कापूस" याचा अर्थ, भारतीय कच्चा कापूस असा आहे; (त्यात सरकीसकट कापसाचा, लिंट कापसाचा व फ्लाय कापसाचा समावेश होतो);

(ख) "संचालक" याचा अर्थ कृषि संचालक, मुंबई राज्य, असा आहे;

(ग) "मालक" याचा अर्थ, कापसातील सरकी काढण्याच्या कारखान्याचा किंवा कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्याचा मालक, असा आहे;

(घ) "व्यापारी" याचा अर्थ, फायदा किंवा नफा मिळण्याच्या हेतूने कापसाची खरेदी किंवा विक्री करण्याचा धंदा जो चालवितो अशा मालकाखेरीज इतर व्यक्ती, असा आहे व तीत असा धंदा चालविणारा—

(एक) माल तयार करणारा, अथवा

(दोन) मालाची आयात करणारा

यांचा समावेश होता, तसेच तीत—

(तीन) जो इतरांकरिता कापसाच्या विक्रीचे किंवा खरेदीचे करार करतो व त्यांच्या वतीने कापसाचा साठा करतो असा दलाल किंवा अडत्या (कमिशन एजंट) यांचाही समावेश होतो;

(ङ) "वर्ष" म्हणजे तारीख १ माहे सप्टेंबर रोजी सुरू होणारे वर्ष;

(च) "कापसातील सरकी काढण्याचा कारखाना" व "कापसाचे गठ्ठे बांधण्याचा कारखाना" या शब्दप्रयोगांचा अर्थ कापसातील सरकी काढण्याच्या व कापसाचे गठ्ठे बांधण्याच्या कारखान्यांबाबत अधिनियम, १९२५ यात जो दिलेला असेल तोच आहे. १९२५ चा १२

कापसासंबंधी वार्षिक पत्रके सादर करणे. ३. (१) प्रत्येक व्यापाऱ्याने व प्रत्येक मालकाने, प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या १५ तारखेस किंवा त्यापूर्वी, [1][राज्य] शासन राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे वेळोवेळी निर्दिष्ट करील अशा अधिकाऱ्यामार्फत, मागील वर्षाच्या शेवटच्या दिवशी त्याच्या कब्जात असलेल्या कापसाच्या परिमाणाचे एक पत्रक विहित केलेल्या नमुन्याप्रमाणे संचालकास सादर केले पाहिजे:

परंतु, राज्य शासनास, कोणतीही वर्षी, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, पत्रके सादर करण्याकरिता कोणतीही नंतरची तारीख ठरविण्याचा अधिकार आहे.

(२) पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या प्रत्येक पत्रकावर ते सादर करणाऱ्या व्यक्तीने सही केली पाहिजे.

(कागदपत्र) पाहण्याचा, तपासण्याचा व शोधण्यांचा हक्क. ४. संचालकास किंवा याबाबत त्याने लेखी अधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कलम ३ अन्वये सादर केलेल्या कोणत्याही पत्रकाचा बिनचूकपणा तपासून पाहण्याच्या कारणासाठी, व्यापाऱ्याच्या किंवा मालकाच्या कब्जात असलेले प्रत्येक संबद्ध दस्तऐवज हिशोबाचे पुस्तक किंवा इतर कागदपत्र पाहण्याचा अधिकार असेल; तसेच कोणत्याही वाजवी वेळी, यथास्थिति व्यापाऱ्यास किंवा मालकास

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नोटीस देऊन किंवा नोटीस दिल्यावाचून असे दस्तऐवज, हिशोबाचे पुस्तक किंवा कागदपत्र तपासण्याचा व त्यांच्या नकला घेण्याचा किंवा त्यातून उतारे घेण्याचा त्यास अधिकार आहे. संचालकास किंवा अशा रीतीने अधिकृत केलेल्या व्यक्तीस कोणतीही माहिती मिळविण्याकरिता आवश्यक असा कोणाताही प्रश्न विचारण्याचा व कोणतीही चौकशी करण्याचा अधिकार आहे. तसेच ज्या कोणत्याही जागेत कापसाचा साठा केला आहे असे त्यास सकारण वाटत असेल त्या जागेत प्रवेश करण्याचाही त्यास अधिकार असेल.

**५.** संचालकास, कलम ३ अन्वये सादर केलेल्या पत्रकाचा व कलम ४ अन्वये मिळविलेल्या माहितीचा पुढील गोष्टीसाठी उपयोग करण्याचा अधिकार आहे :— पत्रकाचा किंवा माहितीचा उपयोग.

१९२३ चा १४ (क) भारतीय कापूस उपकर अधिनियम, १९२३ अन्वये रचना केलेल्या भारतीय मध्यवर्ती कापूस समितीने मागितलेले आकडे गोळा करणे;

(ख) [1][संविधानाच्या] सातव्या अनुसूचीतील सूची २ मध्ये दिलेल्या बाबींशी संबंध असलेली राज्य शासन निर्दिष्ट करील अशी कामे.

**६.** (१) कोणतेही पत्रक किंवा कोणत्याही पत्रकाचा भाग तसेच या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता मिळविलेली कोणतीही माहिती ही, संबंधित व्यापाऱ्याची किंवा मालकाची किंवा त्यांच्या अधिकृत अभिकर्त्याची आगाऊ लेखी संमती घेतल्यावाचून, त्यातील कोणताही तपशील कापसातील सरकी काढण्याचा विशिष्ट कारखाना किंवा कापसाचे गठ्ठे बांधण्याचा विशिष्ट कारखाना किंवा विशिष्ट व्यापाऱ्याचा धंदा यासंबंधी असल्याचे जेणेकरून ओळखता येईल अशा रीतीने प्रसिद्ध करता कामा नये. पत्रके व माहिती प्रसिद्ध करण्यावर निर्बंध.

२२५ चा १२

१८६० चा ४५ (२) या अधिनियमान्वये किंवा भारतीय दंड संहितेअन्वये खटला दाखल करण्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणाकरिता, या अधिनियमान्वये पत्रके तपासणे किंवा माहिती गोळा करणे याच्याशी संबंध नसलेल्या कोणत्याही व्यक्तीस पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेले कोणतेही पत्रक किंवा त्यात उल्लेख केलेली माहिती ज्यात आहे असे कागदपत्र पाहण्याची परवानगी देण्यात येता कामा नये.

**७.** जर कोणतीही व्यक्ती— शास्ती.

(क) कलम ३ अनुसार पत्रक सादर करण्याचे बुद्ध्या नाकारील किंवा वैध सबबीवाचून ते सादर करण्यात हयगय करील; अथवा

(ख) जे कोणतेही पत्रक खोटे असल्याचे त्यास माहीत आहे असे पत्रक बुद्ध्या सादर करील किंवा करवील; अथवा

(ग) या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कोणतीही माहिती मिळविण्यासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही प्रश्नाचे किंवा चौकशीचे उत्तर देण्याचे नाकारील किंवा बुद्ध्या खोटे उत्तर देईल ; अथवा

(घ) संबद्ध दस्तऐवज, हिशोबाचे पुस्तक किंवा इतर कागदपत्र पाहू देण्याबाबत किंवा प्रवेश करण्याबाबत कलम ४ अन्वये दिलेल्या हक्काच्या आड येईल,

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

तर तो, अशा प्रत्येक अपराधाबद्दल पराकाष्ठा पाचशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि अपराध चालू राहिलेच्या बाबतीत पहिल्या दोषसिद्धीनंतर ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील त्या प्रत्येक दिवसाबद्दल पराकाष्ठा आणखी दोनशे रुपये दंडाच्या शिक्षेस पात्र होईल; आणि खोटे पत्रक सादर केल्याच्या किंवा खोटे उत्तर दिल्याच्याबाबतीत खरे पत्रक सादर करण्यात येईपर्यंत किंवा खरे उत्तर देण्यात येईपर्यंत अपराध चालू राहिला आहे असे समजले पाहिजे.

माहिती किंवा पत्रके अयोग्य रीतीने उघड केल्याबद्दल शास्ती.

**८.** या अधिनियमान्वये पत्रके तपासण्याच्या किंवा माहिती गोळा करण्याच्या कामाशी संबंध असलेली जी कोणतीही व्यक्ती या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये पार पाडण्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणाकरिता किंवा या अधिनियमाखालील किंवा भारतीय दंड संहितेखालील अपराधाबद्दल खटला दाखल करण्याच्या कारणाव्यतिरिक्त इतर कारणाकरिता या अधिनियमान्वये दिलेली कोणतीही माहिती किंवा सादर केलेल्या पत्रकांतील कोणताही मजकूर बुद्ध्या उघड करील तो, पराकाष्ठा सहा महिने मुदतीच्या कैदेच्या शिक्षेस पात्र होईल किंवा पराकाष्ठा एक हजार रुपये पर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल. १८६० चा ४५

अपराधांची दखल घेणे.

**९.** कलम ७ अन्वये दाखल करावयाचा कोणताही खटला संचालकाव्यतिरिक्त इतर व्यक्तीने किंवा संचालकाची आगाऊ लेखी मंजुरी घेतल्यावाचून दाखल करता कामा नये आणि कलम ८ अन्वये दाखल करावयाचा कोणताही खटला राज्य शासनाव्यतिरिक्त इतर कोणीही किंवा [१][राज्य] शासनाची आगाऊ लेखी मंजुरी घेतल्यावाचून दाखल करता कामा नये.

सद्भावनापूर्वक केलेल्या कृत्यांबद्दल संरक्षण.

**१०.** या अधिनियमान्वये सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा जे करण्याचा इरादा आहे अशा कोणत्याही कृत्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर वैध कारवाई दाखल करता कामा नये.

संस्थांनी केलेले अपराध.

**११.** या अधिनियमाच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधाचे उल्लंघन करणारी व्यक्ती जर एखादी कंपनी किंवा इतर एकव्यक्तिभूत संस्था असेल तर, यथास्थिति अशा कंपनीचा किंवा संस्थेचा चिटणीस, व्यवस्थापक किंवा तिच्या कामाची व्यवस्था पाहणारा इतर प्रमुख अधिकारी हा अशा उल्लंघनाबद्दल दोषी असल्याचे समजण्यात येईल.

वगळणे.

**१२.** [१][राज्य] शासनास, सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही व्यापाऱ्यास किंवा कोणत्याही वर्गातील व्यापाऱ्यास या अधिनियमाच्या कक्षेतून वगळण्याचा अधिकार आहे.

नियम करण्याचा अधिकार.

**१३.** (१) [१][राज्य] शासनास, या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याकरिता नियम करण्याचा अधिकार आहे. असे नियम, ते कायम करण्यापूर्वी आगाऊ प्रसिद्ध करण्यात आले पाहिजेत.

---

[१] विधि अनुकूलन आदेश, १९५० याद्वारे "प्रांतिक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊ न देता या कलमान्वये केलेल्या नियमात पुढील गोष्टींबाबत तरतूद करता येईल :—

(क) कलम ३ अन्वये पत्रक ज्या नमुन्याप्रमाणे सादर केले पाहिजे तो नमुना विहित करणे; आणि

(ख) हिशोबाची पुस्तके, कागदपत्र व दस्तऐवज पाहू देण्यासंबंधी व प्रवेश करण्यासंबंधी कलम ४ अन्वये दिलेल्या हक्काच्या बजावणीचे नियमन करणे.

[१][(३) या कलमान्वये केलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे, तीस दिवसांपेक्षा कमी नाही इतके दिवस ठेवण्यात येईल आणि ते ज्या अधिवेशनात अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या निकट पुढील अधिवेशनात राज्य विधानमंडळ त्यात जे फेरफार करील त्यास ते नियम अधीन असतील आणि ते राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.]

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ याच्या कलम ५ याद्वारे पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

येरवडा कारागृह मुद्रणालय, पुणे-४११ ००६